॥ श्रीगणेशायनमः ॥ हॉटेल बळीराजा ॥ श्री दत्त कृपा ॥
बळीराजा AGRO RESORT
फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अँण्ड फास्ट फूड
* साऊथ इंडियन * पंजाबी * चायनीज * तंदूर * महाराष्ट्रीयन
नाष्टा व जेवणाची उत्तम सोय
संपर्क : 8999854954, 8668738334
पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड

सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे

हॉटेल गौरव
रेस्टो बार, डिलक्स रूम
एसपी ऑफीससमोर, बार्शी रोड, बीड
प्रो.प्रा.नितीन खोड
एक वेळ आवश्य भेट द्या

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक १७० ■ मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४
Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu-170 ■ Tuesday, 18 August -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4

# तुम्ही २५ आमदार पाडले तर आम्ही १०० आमदार पाडू, मनोज जरांगेंना लक्ष्मण हाकेंच प्रतिआव्हान

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी थेट सरकारला इशारा देत २०२९ मध्ये तुमचे २५ आमदार पाडू, सरकारही पाडू, असे म्हणत ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांना जाहीरपणे प्रतिआव्हान दिले आहे. गेवराईतील कार्यक्रमात हाके म्हणाले, मनोज जरांगेंना राजकारणाचं गणित कळत नाही. तुम्ही आमचे २५ आमदार पाडणार असाल, तर आम्ही तुमचे १०० आमदार पाडू. त्यामुळे मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षाचा राजकीय आखाडा आणखी तापल्याचे दिसून येत आहे.आरक्षणाच्या मुद्द्यावर सुरू असलेला हा संघर्ष आता थेट निवडणुकीच्या राजकारणापर्यंत पोहोचलाय. २०२९ मध्ये खरंच कोणाची ताकद भारी पडणार जरांगे की हाके याचा फैसला आता महाराष्ट्राची जनता करणार आहे.



मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीला मराठवाड्यात ४९ हजार ३५८ नोंदी आढळल्या आहे. त्यापैकी फक्त २० हजार १४३ लोकांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केले. १५ हजार ५९७ लोकांना कुणबी म्हणून ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले. हेच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचे यश असल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी सांगितले.

शासनाच्या आकडेवारी नुसार न्यायमूर्ती शिंदे समिती नंतर ज्या ३ लाख ११ हजार २८७ लोकांना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा असल्याचे जात प्रमाणपत्र देण्यात आले त्यापैकी २ लाख ९१ हजार १४४ यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज का केला नाही हा सवाल राष्ट्रीय ओबीसी महासंघाने उपस्थित केला आहे.

ज्याच्याकडे कुणबी नोंदीचे कागदपत्र आहे. त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळालाच पाहिजे. हि राष्ट्रीय ओबीसी महासंघाची भूमिका आहे, ज्यांना ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले त्यांचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या स्वागत असल्याचे देखील तायवाडे यांनी सांगितले आहे. खोट्या कागदपत्रावर जात वैधता प्रमाणपत्र आम्ही सहन करणार नसल्याचे तायवाडे यांनी स्पष्ट केले.

◀◀ पान २ वर

## मनोज जरांगे ५८ लाख कुणबी नोंदींचा उल्लेख करून संभ्रम निर्माण करतायत: बबनराव तायवाडे

मनोज जरांगे वारंवार ५८ लाख कुणबी नोंदीचा उल्लेख करून मराठा व ओबीसी संभ्रम निर्माण करत आहे, असा आरोप राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केला आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीने आजवर राज्यात शोधलेल्या कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी नोंदी या ५८ लाख ९० हजार १५५ आहे . मात्र यात ३७ लाख ४७ हजार १४२ नोंदी या जुन्या १९८६ ते २०२३ दरम्यानच्या नोंदी आहे, ज्यांना आधीच ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले आहे. ज्याचा मनोज जरांगे यांच्या आंदोलनाशी कुठलाही संबंध नसल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाने स्पष्ट केले आहे .



# बीड जिल्ह्यात ऊसामध्ये गांजाची शेती!
## पोलिसांच्या कारवाईत ५० लाखांचा मुद्देमाल जप्त

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील हरिश्चंद्र पिंपरी येथे ऊस आणि कापसाच्या पिकाच्या आड गांजाची लागवड केल्याचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला. पोलिसांच्या कारवाईत गांजाची तब्बल ११६ झाडे आढळून आली. सहा ते सात फूट उंचीच्या या झाडांची किंमत अंदाजे ५० लाख रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.हरिश्चंद्र पिंपरी येथील संदीपान विठ्ठलराव शिंदे (वय ४०) यांच्या शेतात ऊस व कापसाचे पीक आहे. याच



पिकांच्या आड गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शेतात कारवाई केली असता गांजाची ११६ झाडे आढळून आली. या झाडांची उंची सहा ते सात फूट असल्याचे समोर आले. पोलिसांनी गांजाची झाडे ताब्यात घेतली असून, घटनास्थळी पंचनामा करण्याचे काम सुरू होते. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत अंदाजे ५० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

◀◀ पान २ वर

# बीड जिल्हयातील वेठबिगारी, बालमजूरी, बालविवाह, नशामुक्त भारत, या सर्व समस्या सोडवणार - उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व इन्टरनॅशनल जस्टिस मिशन, जिल्हा प्रशासन बीड, जिल्हा वकील संघ, बीड व जिल्हा पोलीस दल बीड यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९-०० वाजता वॉकेथॉन २०२६ चे उदघाटन मा.श्रीमती सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा यांचे शुभहस्ते संपन्न झाले. सदर कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष न्या.दिनेश पी.सुराणा, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष श्री.बी.एस.बोडखे, पोलीस अधिक्षक श्री.नवनीत कॉवन, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जितीन रहमान, बीड मुख्यालयातील सर्व न्यायाधिश, जिल्हा




वकील संघाचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी व शाळा महाविदयालयातील विदयार्थी/विदयार्थिनी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सांगितले की, बीड जिल्हयातील बालमजूरी, वेठबिगारी, बालविवाह, स्त्री भ्रूण हत्या व नशामुक्त भारत या सारख्या समस्यांना तात्काळ सोडविण्यास मी स्वतः प्रयत्न करेल. तसेच आमचे सर्व प्रशासन सदैव जिल्हा विधी

# वाळू वाहतुकीसाठी ७० हजारांची लाच स्वीकारताना पकडला!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध वाळू उपशाचा मुद्दा गाजत असतानाच अवैध वाळू वाहतुकीसाठी सहकार्य करण्याच्या मोबदल्यात ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना गेवराई तालुक्यातील तलाठ्याला छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी (दि.१८) रंगेहाथ पकडले. विलास राजेंद्र मोराळे असे कारवाई झालेल्या तलाठ्याचे नाव असून ते गेवराई तालुक्यातील खामगाव सज्जा येथे कार्यरत होते.

अवैध वाळू वाहतुकीसाठी सहकार्य करण्याच्या बदल्यात मोराळे यांनी संबंधिताकडे लाचेची मागणी केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर तक्रारीची पडताळणी करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मोराळे यांना पथकाने ताब्यात घेतले. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर पथकातील भास्कर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणी संबंधित तलाठ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. महसूल विभागातील अधिकार्यावर झालेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान, गेवराई तालुक्यातील अवैध वाळू उपशाचा मुद्दा यापूर्वीच चर्चेत आला आहे. घरकुल लाभार्थ्यांसाठीच्या वाळूसह अवैध वाळू उपशाच्या प्रकरणात महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. वाळू उपशाप्रकरणी चकलांबा पोलिस ठाण्यात १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झालेला असतानाच आता अवैध वाळू वाहतुकीला सहकार्य करण्यासाठी तलाठ्याने लाच स्वीकारल्याचे समोर आल्याने महसूल यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. अवैध वाळू उपशाच्या प्रकरणामुळे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावरही कारवाईची टांगती तलवार असतांना पुन्हा ही कारवाई झाल्याने खळबळ उडाली आहे.

# तुकाराम मुंढेंच्या कारवाईवर मुख्यमंत्री फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया

मुंबई । प्रतिनिधी

कडक, प्रामाणिक आणि अतिशय बेधडक अधिकारी म्हणून तुकाराम मुंढे सध्या राज्यात चर्चेत आहेत. गेल्या काही वर्षांत मुंढे हे अशा निवडक अधिकाऱ्यांपैकी एक आहेत, ज्यांनी जनतेचा विश्वास जिंकला आहे. अनेकांनी तुकाराम मुंढे यांची कारवाई करण्याची स्टाईल पाहून त्यांना सिंघम असे म्हणण्यास सुरुवात केली आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी तुकाराम मुंढे करत असलेल्या कारवायांवर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी एफडीएचे तोंडभरुन कौतुक केले आहे.

गृहमंत्री अमित शाहांचा मोठा गौप्यस्फोट! स्वातंत्र्यदिनाच्या अगदी एका दिवसापूर्वी... धक्कादायक माहितीचा खुलासा

देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना एफडीएच्या कारवाईबाबत प्रश्न विचारले होते. त्यावर उत्तर देत मुख्यमंत्री म्हणाले की, मला असं वाटतंय राज्यात कडून उत्तम कारवाई सुरू आहे. सगळ्यात पहिले तर फूड अडल्ट्रेशन किंवा कोणत्याही प्रकारचे मानक आहेत त्यांच्यावर जेव्हा कोणी प्रश्न उपस्थित करतात तेव्हा लोकांच्या जीवाला धोका असतो.

"एफडीएची कारवाई सतत होत राहणार" ◀◀ पान २ वर

# शिंदेंसोबत गेलेले त्यावेळचे सगळे आमदार अपात्रच, ठाकरेंच्या वकिलांकडून दहाव्या अनुसूचीचा दाखला

प्रारंभ । वृत्तसेवा

दहाव्या अनुसूचीनुसार काही आमदारांनी किंवा खासदारांनी पक्ष सोडला तर ते आपोआप अपात्र ठरतात. जर दोन तृतियांश आमदार किंवा खासदारांनी जर पक्ष सोडला तर ते वेगळ्या पक्षात विलीन करू शकतात. परंतु शिवसेनेच्या फुटीबाबत मात्र निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी या विरोधात निर्णय घेतला, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. वेगळ्या पक्षात न विलीन होता एकनाथ शिंदे यांनी आम्हीच पक्ष आहोत असा दावा केला होता. त्या दाव्यावर ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी आक्षेप घेतला.



आमदार अपात्रतेचा निर्णय हा आधी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी घ्यायला हवा होता, त्यानंतर निवडणूक आयोगाचा निर्णय अपेक्षित होता. पण शिवसेनेच्या प्रकरणात हेदेखील पाळण्यात आलं नसल्याचा दावा सिब्बल यांनी केला.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत दोन गट पडले. या प्रकरणात विधानसभा अध्यक्षांनी दोन्ही गटाच्या आमदारांची पात्रता कायम ठेवली, परंतु शिंदेंच्या शिवसेनेलाच मुख्य शिवसेना पक्षाची मान्यता दिली. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला निवडणूक आयोगानेही शिवसेना चिन्ह आणि पक्ष हा शिंदेंच्या गटाला दिला. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्याची सुनावणी आता अंतिम टप्प्यात आलेली आहे.

विधानसभा अध्यक्षांचा निर्णय चुकीचा, सिब्बलांचा दावा

विधिमंडळ पक्षात जर दोन गट पडले आणि दोघांनीही दोन व्हिप नेमले तर त्यावेळी काय करायचं यासंबंधी वेगळा नियम आहे. राजकीय पक्ष कुणाकडे आहे हे आधी विधानसभा अध्यक्षांनी ठरवणं अपेक्षित आहे हे पाहावं. जर राजकीय पक्षामध्येही दोन गट असतील तर मूळ पक्ष कुणाकडे आहे हे विधानसभा अध्यक्षांनी पाहावं आणि त्या आधारे विधानसभा अध्यक्षांनी अपात्रतेचा निर्णय घ्यायचा, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

मात्र शिवसेना प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दोन्ही गटांचे आमदार अपात्र केले नाहीत. त्यांनी शिंदेंचे व्हिप गोगावलेंना मान्यता दिली आणि पुढील निर्णय दिला आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे तो चुकीचा असल्याचा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी या आधी निवडणूक आयोगाचा निर्णय कसा चुकीचा होता, त्यांनी कशा पद्धतीने अधिकारक्षेत्राबाहेर निर्णय घेतला यासंबंधी युक्तिवाद केला. आजच्या दिवशी सिब्बल यांनी आमदारांच्या अपात्रतेवर युक्तिवाद केला. ◀◀ पान २ वर

# मराठ्याचं वादळ मुंबईत धडकणार? मनोज जरांगे पाटलांचा 'गनिमी कावा' उघड, पोलीस अलर्ट मोडवर

जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झालेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आगामी २९ ऑगस्टच्या आंदोलनासाठी 'गनिमी कावा' वापरणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर आता या आंदोलनासंदर्भात एक मोठी आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणारी अपडेट समोर आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून सुरू होणारे आंदोलन हे अंतरवाली सराटीमध्ये करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, गनिमी कावा असेल याचा अंदाज बांधला जात होता.

जरांगे पाटलांच्या या आंदोलनासाठी थेट मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात परवानगीसाठी अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता २९ ऑगस्टचे मुख्य आंदोलन अंतरवाली सराटीत होणार की थेट मुंबईत धडकणार, असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मराठा समाजाने आता अंतरवाली सराटीऐवजी थेट राज्याची राजधानी असलेल्या मुंबईतच भव्य आंदोलन उभारण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, अद्याप अंतरवाली सराटीतील आंदोलनासाठी प्रशासनाकडे कोणतीही अधिकृत परवानगी मागण्यात आलेली नाही. मात्र, दुसरीकडे मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनासाठी परवानगी मिळवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.



# हवामान बदलाची दाहकता

हवामान बदलामुळे भारतात उष्णतेच्या लाटांची तीव्रता आणि कालावधी वाढत आहेत. वाढते तापमान, जंगलतोड, शहरीकरण आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. दुसरीकडे, मान्सून उशिरा सुरू होणे किंवा पावसात खंड पडणे



यामुळे शेती, पिण्याचे पाणी आणि जलसाठ्यांवर गंभीर परिणाम होतो. पिकांचे नुकसान, अन्नधान्य उत्पादनात घट आणि उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ प्रमुख दुष्परिणाम आहेत. जलसंधारण, वृक्षारोपण, हवामानपूरक शेती आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी शाश्वत विकासाचा स्वीकार ही काळाची गरज आहे. मानवाच्या अनियंत्रित विकासाच्या मॉडेलमुळे निर्माण झालेला हवामान बदल आता केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही; तो मानवी अस्तित्व, अर्थव्यवस्था आणि अन्नसुरक्षेशी थेट जोडला गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून दक्षिण आशियात उष्णतेच्या लाटा आणि लांबलेला मान्सून ही जवळपास दरवर्षीची बाब झाली आहे. भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या तिन्ही देशांमध्ये उन्हाळ्यातील तापमान ४५ ते ५० अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत आहे. त्याचवेळी मान्सूनचे आगमन उशिरा होणे, पावसात मोठे खंड पडणे आणि पर्जन्यमानाचे असमान वितरण ही संकटे अधिक तीव्र होत आहेत. परिणामी, लाखो नागरिकांचे आरोग्य, शेती, पाणीपुरवठा आणि रोजगार धोक्यात आले आहेत. उष्णतेच्या लाटा हा पूर्वी अपवादात्मक प्रकार मानला जात होता. आता मात्र तो नित्याचा अनुभव बनला आहे. हवामानशास्त्रज्ञांच्या मते, यंदाची उष्णतेची लाट केवळ तापमानामुळे नव्हे, तर तिच्या दीर्घ कालावधीमुळे अधिक धोकादायक ठरली आहे. अनेक भागांत सलग अनेक दिवस प्रखर उष्णता कायम राहिल्याने मानवी शरीराला विश्रांती मिळण्याची संधीच मिळाली नाही. विशेषतः वृद्ध, लहान मुले, गर्भवती महिला, बांधकाम कामगार, शेतकरी आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांवर त्याचा सर्वाधिक परिणाम झाला. या परिस्थितीमागे अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणे आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण होणारी उच्च दाबाची हवामान व्यवस्था वातावरणात उष्णता अडकवून ठेवते. त्यामुळे गरम हवा वर जाऊ शकत नाही आणि तापमान सतत वाढत राहते. यावर्षी एल-निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचे आगमनही उशिरा झाले. परिणामी, उष्णतेची लाट अधिक काळ टिकून राहिली. हवामान बदलामुळे अशा घटना अधिक वारंवार आणि अधिक तीव्र होत असल्याचे जगभरातील वैज्ञानिक सातत्याने अधोरेखित करत आहेत. या बदलांचा सर्वाधिक फटका शेतीला बसत आहे. दक्षिण आशियातील अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणात मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर न आल्यास किंवा कमी झाल्यास पेरण्या उशिरा होतात. दुष्काळसदृश परिस्थिति निर्माण झाल्याने अन्नधान्याचा तुटवडा आणि महागाई वाढते. पिण्याच्या पाण्याची टंचाई हे या संकटाचे आणखी एक गंभीर रूप आहे. धरणांतील पाणीसाठे कमी होतात, भूजलपातळी खालावते आणि गावोगावी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. अनेक शहरांमध्ये पाणीपुरवठ्यावर निर्बंध लावावे लागतात. ग्रामीण भागात महिलांना पाण्यासाठी किलोमीटरच्या अंतरावर जावे लागते. पाण्याची कमतरता वाढली, की जलजन्य आजारांचाही धोका वाढतो आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येतो. उष्णतेच्या लाटांचा परिणाम केवळ आरोग्यापुरता मर्यादित राहत नाही. भारताने हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करणे, सौर आणि पवन ऊर्जेला प्रोत्साहन देणे, विद्युत वाहनांचा वापर वाढविणे, हरित ऊर्जेतील गुंतवणूक वाढविणे आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर भर देणे अशा अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत. तथापि, हवामान बदल हा जागतिक स्वरूपाचा प्रश्न असल्यामुळे केवळ एका देशाच्या प्रयत्नांनी तो पूर्णपणे नियंत्रणात येणार नाही. विकसित देशांनीही कार्बन उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी तितक्याच प्रामाणिकपणे स्वीकारणे आवश्यक आहे. हवामान बदलाचे दुष्परिणाम आता केवळ दक्षिण आशियापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. युरोपमध्येही अभूतपूर्व उष्णतेच्या लाटा अनुभवास येत आहेत. फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इटली आणि ब्रिटनसारख्या देशांमध्ये तापमान ४० ते ४३ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले आहे. अनेक ठिकाणी शाळा बंद ठेवाव्या लागल्या, सार्वजनिक आरोग्य इशारे जारी करण्यात आले आणि विशेषतः वृद्ध नागरिकांमध्ये मृत्यूचे प्रमाण वाढले. थंड हवामानाची सवय असलेल्या युरोपीय समाजासाठी ही परिस्थिती अत्यंत गंभीर ठरली आहे. भारतात उन्हाळ्यात ४७ ते ४८ अंश तापमान नवीन नाही; परंतु भारतातील लोकसंख्या उष्ण हवामानाशी काही प्रमाणात जुळवून घेतलेली आहे. युरोपमध्ये मात्र अशा तापमानाची सवय नसल्यामुळे त्याचा आरोग्यावर अधिक गंभीर परिणाम होतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की हवामान बदलाचा परिणाम प्रत्येक प्रदेशात वेगवेगळ्या स्वरूपात दिसतो. एखाद्या प्रदेशाची सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक क्षमता किंवा असुरक्षितता यावर त्याचे परिणाम अवलंबून असतात. आज जग एका निर्णायक टप्प्यावर उभे आहे. जंगलतोड, जीवाश्म इंधनांचा अतिवापर, अनियंत्रित औद्योगिकीकरण आणि वाढते शहरीकरण यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. त्याचा परिणाम म्हणून उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि समुद्रपातळीत वाढ यांसारख्या घटना अधिक तीव्र होत आहेत. भविष्यात ही परिस्थिती आणखी बिकट होऊ नये, यासाठी तातडीने कृती करणे आवश्यक आहे. वृक्षारोपण, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, शाश्वत शेती, हरित ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक आणि ऊर्जा बचत यांसारख्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे. त्याचबरोबर शहरांचे हवामानपूरक नियोजन, उष्णतेच्या लाटांसाठी पूर्वसूचना प्रणाली आणि आरोग्य यंत्रणेची तयारीही तितकीच आवश्यक आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटा आणि लांबणारा मान्सून ही निसर्गाची साधी चक्रे राहिलेली नाहीत; ती मानवी हस्तक्षेपाची गंभीर चेतावणी आहेत. पृथ्वी अधिक तापत गेली, तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी, अन्न आणि सुरक्षित

# एक मोबाईल, एक डेस्कटॉप आणि...

आज 'वर्क फ्रॉम होम' किंवा 'वर्क फ्रॉम एनीव्हेअर' ही संकल्पना सर्वश्रुत झाली आहे. मात्र जगाला या पद्धतीची सवय होण्याच्या कित्येक वर्षांपूर्वी एका भारतीय महिलेने या संकल्पनेवर विश्वास ठेवत स्वतःचा व्यवसाय उभा केला होता. केवळ २५ हजार रुपयांच्या भांडवलावर घरातून सुरू झालेला तिचा हा प्रवास भांडवलाच्या हजारपट पोहोचला आहे. ही कहाणी आहे श्वेता जैन सन्याल यांची. २००९ मध्ये त्यांनी कोलकाता येथून 'कनेक्शन्स' ही रिक्रूटमेंट कन्सल्टन्सी सुरू केली. सुरुवातीला ना मोठे कार्यालय, ना कर्मचारी, ना मोठी गुंतवणूक. फक्त एक डेस्कटॉप संगणक, एक मोबाईल फोन आणि स्वतःवर असलेला अढळ विश्वास. आज त्यांची कंपनी देशभरातील नामांकित एफएमसीजी, एफएमसीडी, उत्पादन उद्योग, बँकिंग, वित्तीय संस्था आणि नव्या युगातील स्टार्टअप्ससाठी वरिष्ठ आणि मध्यम स्तरावरील कर्मचाऱ्यांची भरती करते. कंपनीची उलाढाल काही कोटी रुपये इतकी झाली. श्वेताचा जन्म आणि शिक्षण झारखंडमधील हजारीबाग या छोट्याशा शहरात झाले. रांचीपासून सुमारे ९० किलोमीटर अंतरावर असलेल्या या शहरात ती एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली. सेंट झेवियर्स स्कूलमधून बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर तिने विनोबा भावे विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात बी. ए. आणि एम. ए. केले. लग्नानंतर नोकरी सांभाळत श्वेताने दूरस्थ शिक्षणाद्वारे एमबीए पूर्ण केले. शिक्षण आणि करिअर या दोन्ही गोष्टींमध्ये सातत्य ठेवण्याचा तिचा निर्धार पुढे तिच्या यशाचा पाया ठरला. २००४ मध्ये श्वेताचा विवाह मनुष्यबळ क्षेत्रातील व्यावसायिक ब्रंतिंद्र सन्याल यांच्याशी झाला. लग्नानंतर श्वेता मुंबईत स्थायिक झाली. सुरुवातीला तिने सिटीकॉर्पमध्ये कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह म्हणून काम केले. २००६ मध्ये तिने एका छोट्या एचआर आणि रिक्रूटमेंट कन्सल्टन्सीत काम सुरू केले. काही महिन्यांतच पतीच्या नोकरीमुळे तिला हैदराबादला स्थलांतर करावे लागले. तिथे श्वेताने टाइम्स जॉब्समध्ये रिक्रूटर म्हणून काम केले. कर्मचाऱ्यांची निवड आणि भरती या क्षेत्रातील तिचा अनुभव इथे अधिक समृद्ध झाला. २००७ मध्ये पुन्हा कोलकाताला स्थलांतर झाले. तिथे तिने जागतिक दर्जाच्या रिक्रूटमेंट कंपनी असलेल्या अडेकोमध्ये काम करत उद्योगातील बारकावे जवळून अनुभवले. २००८ मध्ये श्वेता यांनी नोकरीचा राजीनामा दिला. नोकरी करताना तिने अनेक कंपन्यांशी व्यावसायिक संबंध



निर्माण केले होते. स्वतःची कंपनी सुरू करण्यापूर्वी तिने काही ग्राहकांशी चर्चा केली. जर मी उत्तम दर्जाचे उमेदवार उपलब्ध करून दिले, तर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल का? असा प्रश्न तिने विचारला. या प्रश्नाला व्यावसायिक कंपन्यांकडून सकारात्मक उत्तर मिळाले. २००९ मध्ये श्वेताने अवघ्या २५ हजार रुपयांत 'कनेक्शन्स'ची स्थापना केली. ही संपूर्ण रक्कम तिने 'नोकरी डॉट कॉम'च्या डेटाबेसचे सदस्यत्व घेण्यासाठी खर्च केली. सुरुवातीला श्वेताकडे स्वतःचे कार्यालय नव्हते. आपल्या बेडरूममधूनच तिने काम सुरू केले. एक डेस्कटॉप, एक मोबाईल आणि स्वतःची मेहनत एवढीच तिची संपत्ती होती. आज अनेक कंपन्या घरून काम करण्याची सुविधा देतात. पण श्वेताने ही कल्पना २००९ मध्येच स्वीकारली होती. तिच्या मते, प्रत्येक कामासाठी कार्यालयात बसणे आवश्यक नसते. याच विचारातून तिने घरातून काम करणाऱ्या महिलांचे नेटवर्क तयार करण्यास सुरुवात केली. विशेषतः अशा महिला, ज्यांना मुलांची किंवा कुटुंबाची जबाबदारी सांभाळत करिअर करायचे होते, त्यांच्यासाठी तिने लवचिक कामाची संधी निर्माण केली. कोरोनाच्या कित्येक वर्षांपूर्वीच तिने प्रत्यक्षात वर्क फ्रॉम एनीव्हेअर मॉडेल यशस्वी करून दाखवले. आज श्वेताच्या कंपनीत ११ पूर्णवेळ कर्मचारी आणि १८ फ्रीलान्सर कार्यरत आहेत. ऑफिस नसल्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेक ग्राहक साशंक होते. काही कंपन्यांनी तर काम देण्यापूर्वी श्वेताच्या कार्यालयाची पाहणी करण्याची अट घातली होती. मात्र, श्वेताने दर्जेदार सेवा आणि योग्य उमेदवार उपलब्ध करून देत ग्राहकांचा विश्वास जिंकला. कोका-कोला आणि इमर्सन या दोन कंपन्यांपासून सुरू झालेला प्रवास हळूहळू विस्तारत गेला. आज तिच्या ग्राहकांमध्ये अनेक मोठ्या भारतीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. पहिल्या वर्षी कंपनीचा महसूल ५.७५ लाख रुपये होता. त्यानंतर दरवर्षी व्यवसाय वाढत गेला आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कंपनीची उलाढाल २.५० कोटी रुपये झाली. आज तिची कंपनी पूर्णपणे नफा कमावणारी कंपनी आहे. तिच्या व्यवसायाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांकडून कोणतेही शुल्क घेतले जात नाही. कंपन्यांकडूनच नियुक्तीच्या पदानुसार शुल्क आकारले जाते. ज्युनियर पदांसाठी एका महिन्याच्या पगाराइतके शुल्क, तर वरिष्ठ पदांसाठी वार्षिक सीटीसीच्या १० ते १८ टक्क्यांपर्यंत शुल्क आकारले जाते. आजही वरिष्ठ पदांसाठीचे उमेदवार श्वेता स्वतःच तपासते. ती उमेदवारांशी झूमवर संवाद साधते. आवश्यक वाटल्यास प्रत्यक्ष भेटही घेते. २०१३ मध्ये मुलगी ताशिका आणि २०१५ मध्ये मुलगा शौर्य यांच्या जन्मानंतर काही काळ श्वेताला व्यवसाय आणि कुटुंब यांच्यात समतोल साधावा लागला. मात्र, २०१७ पासून तिने पुन्हा पूर्ण क्षमतेने व्यवसायात लक्ष घातले. आज श्वेता यशस्वी उद्योजिका, आई आणि प्रेरणादायी नेतृत्वाचे उदाहरण बनली आहे. २०२० पासून 'कनेक्शन्स'ने 'लेट्स टॉक टॅलेंट' हे डिजिटल एचआर न्यूजलेटर सुरू केले. एचआर क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांचे अनुभव आणि विचार यात प्रकाशित केले जातात. आजपर्यंत या न्यूजलेटरच्या १३ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. 'कनेक्शन्स'ने आतापर्यंत देशभरात १ हजारांहून अधिक मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील नियुक्त्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. श्वेतासाठी हा केवळ व्यवसाय नाही, तर लोकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न आहे. श्वेताचा उद्योजकीय प्रवास सांगतो की मोठे कार्यालय, मोठी गुंतवणूक किंवा मोठा वारसा नसला तरी मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस असावे लागते. घरातील एका खोलीतून सुरू झालेला व्यवसाय आज कोट्यवधी रुपयांची उलाढाल करतो आहे. त्यामागे आहे सातत्य, गुणवत्ता, ग्राहकांचा विश्वास आणि बदलत्या काळाची अचूक ओळख. एका छोट्या शहरातील मुलीने केवळ स्वतःचे भविष्यच घडवले नाही, तर शेकडो महिलांना घरबसल्या करिअरची नवी संधी उपलब्ध करून दिली. खऱ्या अर्थाने, श्वेता जैन सन्यालची ही कहाणी म्हणजे दूरदृष्टी, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर उभ्या राहिलेल्या यशस्वी उद्योजकतेची प्रेरणादायी गाथा आहे.

पान १/४ वरून

## जयहिंद कॅम्पस मिल्लत नगर येथे

शेख मुजीब संपादक दैनिक सिटीजन तथा नगराध्यक्ष प्रतिनिधी, ज्येष्ठ नगरसेवक मोईन मास्टर हाजी नजीर साहब सभापती बाळासाहेब गुंजाळ नगरसेवक वाजेद कुरेशी नगरसेवक दत्ता जाधव नगरसेवक शेख बिलाल नगरसेवक महेश धांडे नगरसेवक जकी सौदागर नगरसेवक खय्युम इनामदार नगरसेवक रईस भाई नगरसेवक इलियास भाई माजी नगरसेवक जुनेद जागीरदार मुजताबा खान सर राष्ट्रवादी अल्पसंख्यांक शहराध्यक्ष शाकिर भाई जानी मोमीन हाजी युनोस साहेब शिंगारे साहेब प्राध्यापक शेख अमर हाजी आयुब बागवान आदी मान्यवरांची उपस्थिती होती आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत जय हिंद एज्युकेशन कॅम्पस च्या वतीने कॅम्पसचे सचिव शेख निजाम जैनुद्दीन यांनी केले यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते समूह नृत्य भाषणे सादर केली यावेळी मोठ्या संख्येने पालक वर्ग व परिसरातील नागरिक उपस्थित होते सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## यशराज पंडित यांच्या

सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. ''वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरणाचे संरक्षण करा'' असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील जाधव होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश काशिद यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच किसनराव भुसे यांनी केले. तर आभार प्रदर्शन अप्पासाहेब पवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## शालेय समिती अध्यक्षपदी

शाळेच्या प्रगतीत आणि शैक्षणिक विकासात शालेय समितीची भूमिका महत्त्वाची असते. या नूतन निवडीमुळे शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला अधिक प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

या निवडीच्या वेळी नालसाहेब वस्ती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. अंगद उबाळे सर, शाळेचा संपूर्ण शिक्षक वर्ग तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ व गावकरी उपस्थित होते. नूतन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची प्रगती उत्तरोत्तर अशीच होत राहो, अशा सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त

हिने यावेळी अतिशय प्रभावी व प्रेरणादायी भाषण केले. तिच्या भाषणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्वातंत्र्य दिनानिमित्त जीवन प्रगती विद्यालय तसेच गणपतराव मोराळे गुरुजी इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमास प्राचार्य विलास ढाकणे सर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला.

## गेवराईत विधी सेवा

प्रतिबंध, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, शिक्षणाचा अधिकार यांसह विविध कायदेविषयक बाबींवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.कायद्याची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे आणि नागरिकांमध्ये त्यांच्या कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सामाजिक व कायदेविषयक जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वॉकथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

## अभिजीत लोमटे यांच्या आमरण

जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. मुख्याधिकाऱ्यांवर कोणत्या राजकीय नेत्याचा दबाव आहे? असा थेट सवाल आता जनतेतून उपस्थित होत

पान १/४ वरून

आहे.

लोमटे यांच्या मागण्यांना शहरातील सर्व संघटनांनी पाठींबा दिला आहे.चौथ्या दिवशी लोक जनशक्ती पार्टी, युवा भिमसेना, भीमशक्ती संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन व जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, अंबाजोगाई तालुका मराठा सेवा, पँथर सेना, रिपाई व इतर सर्व संघटना व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांना घेराव घालत निवेदन दिले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. या आंदोलनाला खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील मराठा सेवा संघाचे रमेश पाटील यांनी थेट मुख्याधिकाऱ्यांना फोन करून मागण्या तात्काळ मान्य करण्याची मागणी केली आहे.

''अभिजीत लोमटे यांच्या मागण्या या अंबाजोगाईच्या हिताच्या आणि रास्त आहेत. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन मागण्या पूर्ण कराव्यात. अन्यथा येणाऱ्या काळात हे आंदोलन आणखी तीव्र होईल आणि याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची राहील.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी

बंकट स्वामी संस्थान नेकनुर, दि.२२ ऑगस्ट शनिवार रोजी ह.भ.प.शिवानंद महाराज शास्त्री पैठण दि. २३ ऑगस्ट रविवार रोजी विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉक्टर रवी दास जी महाराज शिरसाट ( आळंदी देवाची) दि.२४ ऑगस्ट रोजी सोमवारी ह.भ.प. भगीरथ महाराज काळे नाशिक दि.२५ ऑगस्ट रोजी ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई अंकित मुक्ताईनगर दि. २६ ऑगस्ट बुधवार रोजी ह.भ.प. कबीर महाराज अत्तर सातारा दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन सायंकाळी नऊ ते अकरा या वेळेत संपन्न होईल तसेच दि. २८ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प. संजय जी महाराज पाचपोर रामायणचार्य बुलढाणा विदर्भ यांचे १२ ते २ या वेळेस काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल अशा पद्धतीने श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी या ठिकाणी भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी पूर्ण जिल्हे भरातील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ह.भ.प. शांती ब्रह्मा गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांनी केले आहे

चौकट:-१) भोजनाची व राहण्याची व्यवस्था

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सप्ताह दरम्यान २४ तास भोजनाची भाविक भक्ताना राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे

चौकट २) भव्य दिव्य वॉटरप्रूफ सभा मंडप

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भव्यदिव्य असा वॉटरप्रूफ सभामंडप एक एकर पेक्षा मोठ्या जागेमध्ये उभा करण्यात आलेला आहे या ठिकाणी सर्व कार्यक्रम होणार आहेत.

## बीड जिल्हयातील वेठबिगारी

सेवा प्राधिकरणाच्या यांच्या सोबत राहून काम करेल असे आश्वासन त्यांनी या प्रसंगी दिले. तसेच उपस्थित मुला/मुलींना त्यांनी चांगले शिक्षण घेउन समाज घडविण्याचे सक्षम होण्याचे आवाहन या प्रसंगी त्यांनी आपल्या भाषणात केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मा.श्री.दिनेश पी.सुराणा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बीड जिल्हयामध्ये ११८ वेठबिगारांची सोडवणूक केली असून तसेच त्यांचे पुनर्वसनाचे काम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून चालू आहे. गेल्या १ वर्षामध्ये जवळपास ६० बालविवाह थांबविण्याचे काम केले असून त्या बालिकांना शिक्षणाच्या मूळ प्रवासाहामध्ये आणण्याचे काम चालू आहे. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या वतीने कडा, ता.आष्टी येथे महाशिबीर होणार आहे. सदर महाशिबीराकरिता पालकमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांना महाशिबीराचे निमंत्रण देखील त्यांनी यावेळी देण्यात आले.

त्यानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सयद यांनी आपल्या आभार प्रदर्शन कार्यक्रमामध्ये सांगितले की, भारतातील काही राज्यांमध्ये वेठबिगार प्रतिबंधक कायदयाबाबत मार्गदर्शिक तत्वे

पान १/४ वरून

तयार झालेले असून आपल्या महाराष्ट्र राज्यात देखील अशा प्रकारची मार्गदर्शिक तत्वे तयार करून कशा प्रकारे वेठबिगार यांची सुटका करायची, गुन्हे दाखल करायचे या संदर्भात सविस्तर सूचना आणि मार्गदर्शन कामगार विभाग, तसेच पोलीस प्रशासन विभाग यांना दयाव्यात असेही त्यांनी यावेळी सांगितले. बीड जिल्हयात एकूण ११८ वेठबिगारांची आजपर्यंत सोडवणूक केली असून त्या सर्वांना शासनाच्या वतीने अर्थसहाय योजने अंतर्गत त्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी जेणेकरून त्यांचे पुनर्वसन होईल. व ते मूळ प्रवाहामध्ये येतील अशी विनंती करण्यात आली. त्यास पालकमंत्री मा.सुनेत्राताई पवार यांनी संमती दर्शवली. त्यानंतर रॅलीचा शुभारंभ मा.सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. त्यानंतर रॅली शिवाजी महाराज पुतळा, अण्णाभाउ साठे चैक मार्गे परत जिल्हा न्यायालयात येउन त्या ठिकाणी नर्सिंग महाविदयालयाच्या विदयार्थिनींनी स्त्री भ्रूण हत्येच्या नाटिकाचे सादरीकरण केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधीदूत तत्वशिल कांबळे यांनी केले.

## बीड जिल्ह्यात ऊसामध्ये

पंचनामा व वजनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मुद्देमालाची अधिकृत किंमत स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ऊस-कापसासारख्या पिकांच्या आड गांजाची लागवड करून अमली पदार्थाची निर्मिती करण्याचा प्रकार उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही कारवाई डीवायएसपी अशोक अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, उपनिरीक्षक गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक नामदास, मोरे, हवालदार राऊत, काकडे, शिनगारे, उबाळे आणि जावळे यांच्या पथकाने केली.

## तुम्ही २५ आमदार पाडले

सोलापूरमध्ये नवनाथ वाघमारेंच्या विरोधात मराठा समाज आंदोलनाच्या तयारीत

सोलापुरात ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांच्याविरोधात मराठा समाज आंदोलन करण्याच्या तयारीत आहे. मराठा समाजातील महिलांबाबत वादग्रस्त विधान केल्याने हे आंदोलन केले जाणार आहे. नवनाथ वाघमारे याच्यावर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी काल मराठा समाजाने ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी अद्याप गुन्हा दाखल न केल्याने मराठा समाजातर्फे आज आंदोलन करण्यात येणार आहे. सोलापुरातील चार हुतात्मा स्मारकासमोर आज दुपारी हे आंदोलन करण्यात येणार आहे. दरम्यान, जालना येथे नवनाथ वाघमारे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच नवनाथ वाघमारे दिसेल तिथे हाणा, दहा लाख रुपये बक्षीस मिळवा , अशी घोषणा बार्शी तालुक्यातल्या वैराग येथील मराठा समन्वयक डॉ. कपिल कोरके यांनी केली आहे. वाघमारे यांनी मराठा समाजातील मुलींबाबत आक्षेपार्ह आणि अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप आहे. 'नवनाथ वाघमारे दिसेल तिथे हाणा, गुन्हा देखील माझ्या विरोधात नोंदवा आणि वैरागला येऊन दहा लाख रुपये घेऊन जा', असे कपिल कोरके यांनी म्हटले आहे.

## तुकाराम मुंढेंच्या

पुढे ते म्हणाले की, लोकांचे आरोग्य धोक्यात असते. त्यामुळे त्यावर सक्त कारवाई करणे गरजेचे होते आणि ही कारवाई होत आहे. याचा मला आनंद आहे की अशा प्रकारची कारवाई सुरु आहे. ही एफडीएची कारवाई सतत होत राहणार आहे. कडून सुरू असलेल्या कारवाईबाबत मला आनंद आहे.

शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांनी, आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे असे म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुकाराम मुंढे यांच्याकडून च्या सुरु असलेल्या कारवाईंचे कौतुक पाहून नागरिक देखील आनंदी झाले आहेत.

# रस्ता खुला न केल्यास उपोषण तीव्र करणार; तिसऱ्या दिवशीही ग्रामस्थांचे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

पिंपळगाव घाट (ता. बीड) ते पांढरेवाडी (ता. भूम) या प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न आता अत्यंत पेटला आहे. हा रस्ता तात्काळ खुला करून तो पक्का रस्ता म्हणून विकसित करावा, या मुख्य मागणीसाठी संतोष महादेव तेलप व ग्रामस्थांच्या वतीने पिंपळगाव घाट ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाचा आज तिसरा दिवस उजाडला तरी प्रशासनाकडून ठोस कृती न झाल्याने ग्रामस्थांमधील असंतोष अधिकच तीव्र झाला आहे. गेल्या ७ ते ८ वर्षांपासून या रस्त्याबाबत स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि विद्यार्थी सर्व स्तरांवर पाठपुरावा करत आहेत. विविध प्रशासकीय कार्यालयांत निवेदने दिली, ग्रामसभेचे ठराव जोडले; परंतु अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे आणि हलगर्जीपणामुळे हा प्रश्न आजही जैसे थेच राहिला आहे. रस्ता अभावी शाळकरी मुलांचे शिक्षण, शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतूक आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा पूर्णपणे कोलमडली असून नागरिकांना नाहक मानसिक व शारीरिक




त्रासाला सामोरे जावे लागत आहे. भूमी अभिलेख विभागाने तात्काळ जागेवर येऊन रस्ता मोजणी व मार्किंग करून द्यावे, अशी रास्त मागणी उपोषणकर्त्यांनी लावून धरली आहे. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांनी उपोषणस्थळी सदिच्छा भेट देऊन आंदोलकांची आस्थेने चौकशी केली व पाठिंबा दर्शवला. आंदोलनाचे गांभीर्य ओळखून उल्हास गिराम यांनी तात्काळ बीडच्या तहसीलदारांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. प्रशासकीय दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त करत त्यांनी शेतकऱ्यांचा हा प्रश्न तात्काळ सोडवण्याची आक्रमक मागणी केली. यावर तहसीलदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत ''शेतकरी व ग्रामस्थांच्या सर्व रास्त मागण्या तात्काळ पूर्ण केल्या जातील,'' असा शब्द दिला. तहसीलदारांच्या आश्वासनानंतरही जोपर्यंत भूमी अभिलेख आणि महसूल प्रशासन प्रत्यक्ष जागेवर येऊन काम सुरू करत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा ठाम आणि आक्रमक पवित्रा संतोष तेलप व ग्रामस्थांनी घेतला आहे. आंदोलनस्थळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, विलास महाराज शिंदे, नवनाथ प्रभाळे, नंदु जोगदंड, रविराज भोसकर यांच्यासह पिंपळगाव घाट व परिसरातील शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपोषणाला पाठिंबा देत आहेत. आता तरी बीड तालुका प्रशासन या गंभीर समस्येकडे गांभीर्याने पाहून प्रत्यक्ष काम सुरू करते की आंदोलनाला अधिक उग्र रूप धारण करू देते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# राहुल अन्वीकर हे परिवर्तनवादी चळवळीतील प्रभावी अस्त्र प्रा. ॲड. जयमंगल धनराज

बीड प्रतिनिधी : महाकवी वामनदादा कर्डक यांनी आयुष्यभर शाहू, फुले व आंबेडकरी चळवळीसाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. वामनदादांचा हाच त्याग, संघर्ष आणि समतेचा विचार आपल्या बुलंद स्वरातून राष्ट्रीय पातळीवर पोहोचविणारे सुप्रसिद्ध गायक राहुल अन्वीकर हे परिवर्तन चळवळीतील एक प्रभावी अस्त्र आहेत, असे गौरवद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, मुंबईचे माजी प्राचार्य प्रा. ॲड. जयमंगल धनराज यांनी काढले.

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने शनिवार १५ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आयोजित ५ व्या महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या भव्य सोहळ्यात शाहीर राहुल अन्वीकर यांना रु. २५,००० रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन या मानाच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रो. डॉ. मनोहर शिरसाट यांनी मानपत्राचे प्रभावी वाचन करून अन्वीकर यांच्या प्रबोधनात्मक कार्याचा गौरव केला. पुढे बोलताना प्रा. ॲड. जयमंगल धनराज म्हणाले की, वामनदादांचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवून चळवळीचा भार खांद्यावर घेणे ही सुशिक्षित समाजाची जबाबदारी असल्याचे सांगत, अन्वीकर यांच्यासारख्या राष्ट्रीय कलावंताला हा पुरस्कार मिळणे म्हणजे वामनदादांच्या विचारांचाच सन्मान आहे, असे नमूद केले. डॉ. भारत सोनवणे यांनी राहुल अन्वीकर यांचा सन्मान हा केवळ एका कलावंताचा गौरव नसून त्यांच्या विचारांचा, संघर्षाचा आणि सामाजिक प्रबोधनाच्या कार्याचा सन्मान असल्याचे सांगितले. वामनदादांनी आपल्या वाणीच्या माध्यमातून समाजजागृतीची जी धुरा वाहिली, तीच धुरा राहुल अन्वीकर पुढे नेत असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोपात बोलतांना नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी राहुल अन्वीकर यांच्या प्रबोधनात्मक कार्याचे कौतुक केले. परिवर्तनवादी महापुरुषांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणे ही नालंदा फाउंडेशनची भूमिका आहे. वामनदादांच्या चळवळीचा सांस्कृतिक वारसा पुढे नेणारे खरे नायक राहुल अन्वीकर आहेत, असे ते म्हणाले. तसेच हा पुरस्कार प्रदान झाल्याने नालंदा फाउंडेशनचाही गौरव झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पुरस्कार वितरणानंतर आयोजित करण्यात आलेल्या 'भीम वाणी, वामन गाणी' या सांस्कृतिक कार्यक्रमात राहुल अन्वीकर यांनी आपल्या बुलंद आवाजात सामाजिक व प्रबोधनात्मक गीते सादर करून संपूर्ण नाट्यगृह मंत्रमुग्ध केले. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे नाट्यगृहात टाळ्यांचा कडकडाट घुमत राहिला. व्यासपीठावर मा. उत्पलचंद्र थोरात, मा. प्रा. दीपक जमदाडे आणि मा. प्रा. डॉ. संजय भेदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रा. शरद वंजारे, प्रा. राम गायकवाड, प्रो. डॉ. मनोहर सिरसाट, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रा. दीपक जमदाडे आणि सिद्धार्थ वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले असून, या प्रसंगी बीड शहर व जिल्ह्यातील साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्व समाजाच्या सहभागातून अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

मांडव जाळी । प्रतिनिधी

मांडव जाळी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व समाज बांधवांनी एकत्र येत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी केली. यावेळी गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत सर्व समाजाने एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना रतन गुजर म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी तळागाळातील माणसांना जोडण्याचे आणि समाजातील वंचित घटकांना आवाज देण्याचे महान कार्य केले. त्यांच्यासारखे महापुरुष घडण्याची आज समाजाला गरज आहे. आज आपण सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन अण्णाभाऊंची जयंती साजरी करीत आहोत, याचा मला अभिमान वाटतो. महापुरुषांना केवळ डोक्यावर घेण्यापेक्षा त्यांच्या विचारांना डोक्यात घेणे आणि आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही महापुरुषाने केवळ एका जातीपुरते काम केले नाही. सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन त्यांनी समाजासाठी कार्य केले, म्हणूनच ते महापुरुष झाले. मात्र, आज समाजात ओपन, ओबीसी, एससी, एसबीसी अशा विविध गटांमध्ये विभागणी होत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रत्येक व्यक्ती दुसर्याकडे संशयाने पाहत आहे. हे संशयाचे वातावरण दूर करून सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. आपल्या सुख-दुःखात सर्व समाजातील लोक सहभागी होत असतात. मग एकमेकांशी वागणुकीत भेदभाव का? अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मांडव जाळी येथे सर्व समाज एकत्र आल्याचा मनापासून आनंद होत आहे. गावागावातील नागरिकांनीही अशाच पद्धतीने एकत्र येऊन गुण्यागोविंदाने राहावे, हीच अण्णाभाऊंच्या चरणी प्रार्थना असल्याचे रतन गुजर यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामस्थ तसेच विविध पदांसाठी इच्छुक असलेले कार्यकर्ते आणि गावातील तरुण मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गोपीनाथ थोरात, लहू थोरात, राम थोरात, लक्ष्मण थोरात, सुनील बहिरवाळ, दीपक बहिरवाळ, शरद बहिरवाळ, राम बहिरवाळ, दादासाहेब बहिरवाळ, बबन भैया बहिरवाळ, अनिल बहिरवाळ, गोपाल बहिरवाळ, सुभाष दादा बहिरवाळ, लाला भाऊ बहिरवाळ, लाला भंडाने, वसंत भंडाने, गणेश वीर, शाम वीर, अभिजीत वीर यांच्यासह ग्रामस्थ व तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अशोक थोरात यांनी केले तर आभार सुनिल बहिरवाळ यांनी मानले.

सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागातून अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी सर्व ग्रामस्थ व उपस्थितांचे आभार मानले.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ''भव्य अखंड हरिनाम सप्ताह; किसन बाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित सप्ताहास उपस्थित रहा

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत ह.भ.प. वै. सद्गुरू किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथी निमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतिब्रह्म श्री नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह आयोजन दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी शुक्रवारी करण्यात आलेले आहे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा आरंभ दि.२१ ऑगस्ट २०२६ रोजी संत महंतांच्या उपस्थितीमध्ये दीपप्रज्वलन, ग्रंथ पूजन, टाळ, मृदुंग, विना, पूजन, गुरुपूजन करून तसेच पुष्प वृष्टी करून अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे .

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा पारायण, प्रवचन, हरिपाठ, भावार्थरामायण ,हरी किर्तन, संगीत भजन व हरिजागर असे संपूर्ण सात दिवस भाविक भक्तांना हरी नामाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे दररोज रात्री हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.यामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आपली किर्तन सेवा देणार आहेत.दि. २१ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह. भ.प. नाना महाराज कदम बंकट स्वामी संस्थान नेकनुर, दि.२२ ऑगस्ट शनिवार रोजी ह.भ.प.शिवानंद महाराज शास्त्री पैठण दि. २३ ऑगस्ट रविवार रोजी विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉक्टर रवी दास जी महाराज शिरसाट ( आळंदी देवाची) दि.२४ ऑगस्ट रोजी सोमवारी ह.भ.प. भगीरथ महाराज काळे नाशिक दि.२५ ऑगस्ट रोजी ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई अंकित मुक्ताईनगर दि. २६ ऑगस्ट बुधवार रोजी ह.भ.प. कबीर महाराज अत्तर सातारा दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन सायंकाळी नऊ ते अकरा या वेळेत संपन्न होईल तसेच दि. २८ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प. संजय जी महाराज पाचपोर रामायणचार्य बुलढाणा विदर्भ यांचे १२ ते २ या वेळेस काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल अशा पद्धतीने श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी या ठिकाणी भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी पूर्ण जिल्हे भरातील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ह.भ.प. शांती ब्रह्म गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांनी केले आहे

# श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

बीड : तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण विद्यालयामध्ये १५ ऑगस्ट रोजी विद्यालयामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण माननीय श्री अशोक पांढरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा,विद्यालयाचे प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर,माजी प्राचार्य ढास सर, श्रीमती काळे मॅडम,श्री भीमा गोरे, श्री कुंडलिक रकटे, श्री निलेश सावंत, श्री रामनाथ सुरवसे, श्री रुपनर राजेंद्र, श्री जगताप एस.डी, श्री कारंडे सिद्धेश्वर, इ. उपस्थित होते. मान्यवरांचा शाल,श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. स्व. प्रा. संतोष काळे सर तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात भाग घेतला. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये देशभक्तीपर गीते, लोकगीते, भाषणे इत्यादी सादर करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम श्रीमती प्रा. बबीता भुतावळे मॅडम यांच्या नियोजनानुसार सादर करण्यात आले. सर्वांनी कार्यक्रम यशस्वीतीसाठी उत्साहाने प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री करपे सर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक अशोक घरत सर, श्रीमती जगताप मॅडम तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वडिलांची २९ वर्षांची परंपरा कायम; लातूरच्या ५०० भाविकांची भव्य शिवकावड प्रभू वैद्यनाथाच्या चरणी!

परळी वैजनाथ प्रतिनिधी

पवित्र श्रावण महिन्यानिमित्त पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी लातूर ते परळी अशी भव्य-दिव्य शिवकावड यात्रा रविवारी, दि. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी वैद्यनाथ नगरीत दाखल झाली. लातूर शहरातील मोतीनगर भागातील ललितकुमार बालकिशन शर्मा परिवाराच्या वतीने या शिवकावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे ५०० भाविकांचा सहभाग असलेल्या या कावड यात्रेचे परळीत मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताका आणि 'हर हर महादेव', 'जय भोले', 'वैद्यनाथ भगवान की जय' अशा जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी यात्रेच्या स्वागतासाठी मोठी तयारी केली होती. त्यामुळे या यात्रेला पारंपरिक धार्मिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले. दरम्यान, या शिवकावड यात्रेला यंदा विशेष भावनिक पार्श्वभूमी लाभली. लातूरच्या मोतीनगर भागातील कै. बालकिशन शर्मा यांनी सुमारे २९ वर्षांपूर्वी मोजके मित्र व नातेवाईक यांना सोबत घेऊन लातूर ते परळी शिवकावड पदयात्रेची सुरुवात केली होती. दरवर्षी ही यात्रा काढताना परिसरातील नागरिक व नातेवाईक या यात्रेत सहभागी होत गेले आणि भाविकांची संख्या वाढत गेली. काही महिन्यांपूर्वी बालकिशन शर्मा यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी आजारपणामुळे निधन झाले. वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबाचा मुख्य आधार गमावल्याचे दुःख असतानाही चारही भावांनी वडिलांची परंपरा पुढे सुरू ठेवण्याचा निर्धार केला. श्रावण महिना सुरू झाल्यानंतर त्यांनी पुन्हा शिवकावड पदयात्रा काढण्याचा निर्णय घेतला आणि तयारीला सुरुवात केली. *''वडिलांच्या निधनानंतरही त्यांची श्रद्धा आणि परंपरा पुढे नेत आम्ही यंदाची शिवकावड यात्रा काढत आहोत. ही यात्रा आमच्यासाठी केवळ धार्मिक यात्रा नसून वडिलांच्या स्मृतींना वाहिलेली श्रद्धांजली आहे,'' अशी भावना ललितकुमार बालकिशन शर्मा व विजयकुमार शर्मा (व्यापारी, लातूर) यांनी व्यक्त केली.

# अरुणा असफ अली महिला मंडळ व मांजरा परिसर सेवाभावी संस्थेत एकल महिलांच्या हस्ते ध्वजवंदन संपन्न

बीड प्रतिनिधी :- संपूर्ण राज्यात ५४ लाख ११ हजार एकल महिलांची संख्या २०११ च्या जनगणनेनुसार असून या महिलांकडे समाज आजही तुच्छ नजरेने बघत असतो विधवा, परित्यक्ता अवस्थेत या महिला जीवन जगत असतात समाजात, कुटुंबात, पावलोपावली या महिलांना हिन लेखले जाते, नवरा मरतो हा दोष बाईचा नसतोच परंतु समाज तिलाच पांढऱ्या पायाची पांढऱ्या कपाळाची म्हणून हिनवतो.




देश स्वतंत्र होऊन ८० वर्ष झाली संविधानाप्रमाणे देश चालायला लागला परंतु आजही कुटुंबात स्त्रियांचा दर्जा दुय्यमच आहे. हेरंब कुलकर्णी एकल महिलांची चळवळ महाराष्ट्रात चालवतात पूर्ण वेळ ते या कामासाठीच देतात त्यांनी आपली नौकरी सोडली आहे आणि पूर्णपणे या कामात त्यांनी झोकून दिले आहे. दोन दिवसापूर्वी हेरंब दादांनी एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करून त्यांना सन्मान द्या अशी हाक दिली म्हणून माझ्या संस्थेच्या चालू असलेल्या सर्व शाळांचे झेंडावंदन या विधवा परित्यकांच्या हस्ते करावे अशी विनंती मी सगळ्या मुख्याध्यापकांना एक विश्वस्त म्हणून केली आणि त्यांनी होकार दिला आहे. माझ्या दृष्टीने ही एकल महिलांसाठीची खूप मोठी उपलब्धी असणार आहे. असे प्रतिपादन प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतनमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

बीड : म. शि. प्र. मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील नवीन प्रवेशित प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती, मोक्षगुंडम विश्वेश्वरया, सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमा पूजन करून व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. बाळासाहेब कोल्हे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांचे स्वागत करून पदविका शिक्षणाकडे केवळ परीक्षा व गुण मिळविण्याच्या दृष्टीने न पाहता ज्ञान, कौशल्य, शिस्त, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास यांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थिती ठेवून अभ्यासासोबतच प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, इंडस्ट्री ओरिएंटेड स्किल, टेक्निकल स्किल आणि कम्युनिकेशन स्किल विकसित कराव्यात, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांसाठी आम्ही, डीओलिंगो, ॲप्टिट्यूड, टायपिंग क्लब, स्वयम् , एन.पी.टी.एल, एन.डी.एल.आय इत्यादी ऑनलाइन शैक्षणिक प्लॅटफॉर्मचा उपयोग करून अभ्यासक्रमा बाहेरील ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्यासाठी प्रेरित करत आहोत. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी ए.आय, डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक औद्योगिक कौशल्यांशी स्वतःला अद्ययावत ठेवावे. महाविद्यालयातील प्रयोगशाळा, कार्यशाळा, ग्रंथालय, डिजिटल संसाधने तसेच विविध विद्यार्थी विकास उपक्रमांचा जास्तीत जास्त उपयोग करून इंडस्ट्री रेडी होण्याच्या दृष्टीने तयारी करावी, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिस्त, वेळेचे नियोजन, नियमित अभ्यास, सकारात्मक विचारसरणी आणि जबाबदारीची भावना अंगीकारावी. प्रशिक्षण व प्लेसमेंट, शिष्यवृत्ती, विविध विद्यार्थी विकास उपक्रम आणि महाविद्यालयातील उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्यांनी केले. ''आजची मेहनत हीच उद्याच्या यशाची पायाभरणी आहे'' हा संदेश देत पदविका शिक्षणाचा कालावधी करिअरच्या भक्कम पायाभरणीसाठी उपयोगात आणण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. यानंतर ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी निर्णयक्षमता विकसित करावी, कठोर परिश्रम करावेत आणि योग्य ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. ''ज्ञानाची सुरुवात संशयातून होते'' असे सांगत स्वतःच्या क्षमतेबद्दल असलेल्या शंका दूर करून आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अनावश्यक वापरापासून दूर राहावे आणि मोबाईलचा उपयोग ज्ञान व कौशल्यविकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले. ''बदलाची सुरुवात स्वतःपासून करा'' हा संदेश देत स्वतःच्या विचारांमध्ये व वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून वेळेचे योग्य नियोजन करावे आणि उपलब्ध वेळेचा उपयोग अभ्यास, कौशल्यविकास व व्यक्तिमत्त्व विकासासाठी करावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रमात श्री. योगेश पेंडळकर आर.बी.ओ (एस.बी.आय)यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग सेवा, श्री.राजूरकर महेश यांनी सोशल मीडियाचा योग्य वापर, महाविद्यालयाचे शैक्षणिक समन्वयक प्रा.नखाते एस.बी यांनी ए.आय. सी. टी. ई, डी.टी.ई , राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (), एम.एस.बी टी.ई , संस्थेची दृष्टी व ध्येय, शैक्षणिक नियम व विनियम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच प्रा.मोरे डी.एन यांनी अँटी-रॅगिंग समिती, महिला तक्रार निवारण समिती, प्रा.धुमाळ बी.आर यांनी प्रशिक्षण व प्लेसमेंट, रोजगारक्षमता, यांसारख्या विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती दिली,प्रा. कुलकर्णी जी.एस यांनी स्वयम्, एन.पी.टी.एल, एन.डी.एल.आय इत्यादी ऑनलाइन शैक्षणिक प्लॅटफॉर्मची माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच कार्यालयीन अधीक्षक श्री. तवले एस.एस यांनी विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्रता,आवश्यक कागदपत्रे या मार्गदर्शन केले. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक कार्यपद्धती, नियम, उपलब्ध सुविधा, विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रम तसेच भविष्यातील करिअरच्या संधी यांची सर्वसमावेशक माहिती मिळाल्याने हा स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरला. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब,प्राचार्य डॉ.बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले,तसेच कार्यक्रमाचे नियोजन हे प्रा.उबाळे एल. च, प्रा.वारोडे ए. ए यांनी केले, सदरील कार्यक्रमास सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी व नवीन प्रवेशित विद्यार्थी उपस्थित होते.


BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande (E-mail-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे

सायं. दैनिक
बीड
प्रारंभ
मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०२६






# आष्टीत अवैध कत्तलखान्यांचा आरोप; पोलिसांच्या गस्तीवरच प्रश्नचिन्ह

## गाई-वासरांचे अवशेष शिवारात; कारवाई न झाल्यास गणपती फाटा येथे रास्ता रोकोचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

कासारी-मुर्शदपूर हद्दीतील वारूंगळे वस्ती व शिंदेवाडी शिवारात गाई-वासरांचे मुंडके व मांसाचे अवशेष आढळत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दुर्गंधी आणि भटक्या कुत्र्यांच्या वाढलेल्या वावरामुळे शेतकरी व महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणी ग्रामस्थांनी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. शहरातील कत्तलखाने बंद असून पोलिसांची नियमित गस्त सुरू असल्याचा दावा केला जात असेल, तर मग शिवारात हे अवशेष येतात कुठून? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

कत्तलखाने बंद असल्याचे सांगूनही मांसाचे अवशेष खुलेआम शिवारात आढळत असतील, तर पोलिसांची गस्त नेमकी कुठे आणि कोणासाठी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. या अवशेषांचा उगम शोधून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यासोबतच आष्टी शहरातील कथित अवैध दारूविक्रीवरही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे. दारूबंदी विभागाचे कार्यालय शहरात असतानाही अवैध दारूविक्री सुरू असल्याचा आरोप असेल, तर यंत्रणा नेमकी करतेय तरी काय? असा सवाल करण्यात आला.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास मुलाबाळांसह गणपती फाटा येथे रास्ता




रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता पोलिस प्रशासन या गंभीर आरोपांची चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी दिलेल्या निवेदनावर आष्टी शहराचे नगराध्यक्ष जीया बेग, सरपंच अशोक मुळे, नगरसेवक रंगनाथ धोंडे, सुनील रेडेकर, ग्रामपंचायत सदस्य कपिल अग्रवाल, बंडू गीते, मनोज धनवडे, सचिन काकडे, रामदास दरेकर, अमोल दरेकर, संतोष खंडागळे, बाबासाहेब वारंगुळे, शुभम दरेकर, हनुमंत काकडे, सुनील वारंगुळे, लहू केरळकर, दीपक वारंगुळे, वाल्मीक वारंगुळे, बंडू केरुळकर, शहादेव केरूळकर, चंद्रकांत वारंगुळे, वाल्मीक वारंगुळे, प्रकाश वारंगुळे, यश केरूळकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**पोलिसांचा तो खबऱ्या कोण?**

आष्टी शहरात अवैध कत्तलखाने आणि अवैध दारूविक्रीची माहिती पोलिसांना मिळते; मात्र कारवाईसाठी पोलीस ज्या दिशेने निघतात, त्याआधीच संबंधितांना खबर मिळत असल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. विशेष म्हणजे, पोलीस ज्या दिशेने कारवाईसाठी जातात, त्याच दिशेने पोलिसांमधीलच एक कथित खबऱ्या फिरत असल्याची चर्चा असून, पोलीस येत असल्याची खबर तोच संबंधितांना देतो आणि त्यामुळे पोलीस घटनास्थळी पोहोचेपर्यंत सर्व काही 'साफ' झालेले असते, अशी नागरिकांमध्ये कुजबुज आहे.

जर ही चर्चा खोटी असेल तर पोलिसांनी ती खोटी असल्याचे स्पष्ट करावे; आणि खरी असेल तर पोलिसांच्या हालचालींची माहिती बाहेर कोण पोहोचवत आहे, याचा शोध घेण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल आष्टीकर विचारत आहेत.

पोलिसांच्या कारवाईपूर्वीच आरोपी सावध होतात, तर पोलिसांच्या यंत्रणेतच 'खबर' कुठे लीक होते? या प्रश्नाचे उत्तर आता पोलिस प्रशासनाने जनतेला द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# जयहिंद कॅम्पस मिल्लत नगर येथे भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहण माजी मंत्री शिवाजीरावदादा पंडित यांच्या शुभहस्ते संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नावाजलेले जयहिंद एज्युकेशन कॅम्पस येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला सदरील ध्वजारोहण महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शिक्षण महर्षी माननीय शिवाजीराव दादा पंडित साहेब यांच्या शुभ हस्ते करण्यात आले यावेळी शिवाजीराव पंडित यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना स्वातंत्र्य




मिळवण्यासाठी स्वातंत्र सैनिकांनी व थोर पुरुषांनी जुलमी राजवटी विरुद्ध लढून भारताला स्वातंत्र्य कसे मिळवून दिले याबाबत मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी चांगले दर्जेदार शिक्षण घ्यावे व देशाचे राज्याचे व जिल्ह्याचे नाव मोठे करावे असे आवाहन केले यावेळी हाजी जैनोदीन सेठ, नगराध्यक्ष मा. प्रेमलताताई पारवे यांची प्रमुख उपस्थिती होती यासोबतच ◀◀ पान २ वर



# गजानन विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे ध्वजारोहण विष्णुदास बियाणी यांच्या हस्ते करण्यात आले.

८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वप्रथम ढोलपथकासह महापुरूषांच्या वेशभुषेत गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी डॉ.राजेंद्र वीर यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत नागरीकांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ हे होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त घेण्यात आलेल्या जनरल नॉलेज परीक्षेत दोन गटामध्ये प्रथम व द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. धाडशी रोहन हा पाठ इ. ६ वी मराठी विषयामध्ये ज्याच्या वरती प्रकाशित झाला त्या रोहन रामचंद्र बहीर या विद्यार्थ्याचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्याध्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक विजयकुमार दगडे, भोसले बी. एस., शेख एस. वाय., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले तर श्रीमती पुष्पा मस्कर यांनी उपस्थितांचे आभार मानले. खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# यशराज पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हेरच्या जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण




**गेवराई । प्रतिनिधी**

युवा नेते यशराज पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोल्हेर येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांसह उपस्थित मान्यवरांनी मोठ्या उत्साहात वृक्षारोपण केले.यावेळी यशराज पंडित यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्या शिक्षणाबाबत, आवडी-निवडींबाबत मनसोक्त गप्पा मारल्या. विद्यार्थ्यांमध्येही यावेळी मोठा उत्साह पाहायला मिळाला.

या वेळी प्रतिष्ठित नागरिक चंद्रसेन जाधव, विष्णू माळदकर , रामनाथ माळदकर, कल्याण यादव कैलास शहादेव चक्कर, लक्ष्मण वाळेकर, संतोष भुसे, अप्पासाहेब पवार, लक्ष्मण पवार, अरविंद माळदकर, अमोल कातकडे, सुरेश मुळे गणेश भोसले, जाधव शरद, गणेश भुसे, निखिल पवार, नारायण पवार,अकाश जाधव आदींची उपस्थिती होती. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपणासारख्या ◀◀ पान २ वर

# शालेय समिती अध्यक्षपदी पांडुरंग उबाळे, तर उपाध्यक्षपदी संतोष आढागळे यांची निवड!



गेवराई । प्रतिनिधी

नंदपुर येथील नाल साहेब वस्ती प्राथमिक शाळेच्या शालेय समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड नुकतीच सर्वानुमते पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी श्री. पांडुरंग उबाळे यांची, तर उपाध्यक्षपदी श्री. संतोष आढागळे यांची एकमुखाने निवड करण्यात आली आहे. ◀◀ पान २ वर

# स्वातंत्र्य दिनानिमित्त जीवन प्रगती विद्यालयात विविध कार्यक्रम उत्साहात

नांदूरघाट । प्रतिनिधी

जीवन प्रगती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ संस्थेच्या सचिव सौ. माधुरीताई मोराळे साहेब यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. तसेच गणपतराव मोराळे गुरुजी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा ध्वजारोहण समारंभ संचालक डॉ. रोहितजी मोराळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे आधारस्तंभ मा. राजेशजी मोराळे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा, तसेच मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मा. राजेशजी मोराळे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण कानमंत्र दिला. शाळेची माजी विद्यार्थिनी व कीर्तनकार कुमारी प्रेरणाताई खाडे ◀◀ पान २ वर



# प्रथम श्रावणी सोमवारला सिद्धेश्वर मंदिरात भक्तीचा जागर; रुद्राभिषेक, सव्वालाख नामजप, १२१ पारायण, कीर्तन अन् अरण्येश्वर महादेवाचा विशेष शृंगार

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात श्रावण मास उत्सवानिमित्त प्रथम श्रावणी सोमवार भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत विविध धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पंचक्रोशीतील हजारो भाविकांच्या उपस्थितीने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



दिवसभर ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चारात भगवंतास अखंड रुद्राभिषेक करण्यात आला. त्याचबरोबर 'श्री शिवाय नमस्तुभ्यम' या मंत्राचा अखंड नामजप करण्यात आला. महिलांच्या सहभागातून शिवलीलामृताच्या ११व्या अध्यायाचे अखंड पारायण करण्यात आले. महिलांनी मिळून तब्बल १२१ पारायण पूर्ण केली.

श्रावणी सोमवारचे विशेष आकर्षण ठरलेल्या ह.भ.प. श्री सोपान महाराज इदगे यांच्या कीर्तन सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांच्या भक्तिरसपूर्ण कीर्तनाने पंचक्रोशीतील हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले. दिवसभरातील धार्मिक कार्यक्रमांची सांगता महाशृंगार आरतीने करण्यात आली. यावेळी सहस्र बिल्वार्चनासह अरण्येश्वर महादेवाचा विशेष शृंगार करण्यात आला. आकर्षक सजावटीने नटलेले अरण्येश्वर महादेवाचे मनोहारी रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरले. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचे नियोजन व आयोजन सुकाणू समितीच्या सदस्यांनी केले. समितीच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे सर्व धार्मिक कार्यक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. भाविकांनी या भक्तिमय सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# अभिजीत लोमटे यांच्या आमरण उपोषणाचा आज सहावा दिवस प्रकृती खालावली उपचार घेणार नाही




## नगरपरिषदेवर कोणत्या राजकीय नेत्याचा दबाव? - मुख्याधिकाऱ्यांवर थेट आरोप

## सर्वपक्षीय संघटना रस्त्यावर, मा केंद्रीय मंत्री मनेका गांधी, खासदार बजरंग सोनवणे पाठिंबा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नगरपरिषदेसमोर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांच्या आमरण उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. श्वानांच्या संशयास्पद मृत्यू, मराठा भवन, जयवंती नदी आणि पुरातन विहिरीच्या अतिक्रमणासारख्या रास्त मागण्या असूनही नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे बधीर झाले आहे.

उपोषणामुळे लोमटे यांची प्रकृती खालावली आहे. डॉक्टरांनी तात्काळ वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे. मात्र ''मराठा भवनासाठी जागा उपलब्ध झाल्याशिवाय, जयवंती नदी व पुरातन विहिरीवरील अतिक्रमण काढल्याशिवाय आणि श्वान मृत्यूस जबाबदारांवर गुन्हे दाखल झाल्याशिवाय उपचार घेणार नाही व उपोषण स्थगित करणार नाही''अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

उपोषण स्थळी स्वच्छतेचा अभाव आणि दुर्गंधी आहे. तरीही मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासन ◀◀ पान २ वर

# गेवराईत विधी सेवा समितीतर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त वॉकथॉन रॅली




गेवराई । प्रतिनिधी

बीड प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्री.दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यदिनानिमित्त गेवराई येथे गेवराई तालुका विधी सेवा समिती, आणि गेवराई वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वॉकथॉन जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता ध्वजारोहण कार्यक्रमानंतर या वॉकथॉन रॅलीला सुरुवात झाली. हि रॅली न्यायलय ते नगर परीषद पर्यंत काढण्यात आली होती.या

रॅलीमध्ये गेवराई न्यायालयाचे न्यायाधीश मिसाळ साहेब, न्यायाधीश मोमिन साहेब, न्यायाधीश पाटील मॅडम तसेच गेवराई वकील संघातील विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या वॉकथॉनच्या माध्यमातून बालमजुरी प्रतिबंध, वेठबिगार मजुरी प्रतिबंध, बालविवाह ◀◀ पान २ वर

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे 'भव्य अखंड हरिनाम सप्ताह'

## किसन बाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित सप्ताहास उपस्थित रहा:- शांतीब्रह्म नवनाथ बाबा



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत ह.भ.प. वै. सद्गुरू किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथी निमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतिब्रह्म श्री नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह आयोजन दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी शुक्रवारी करण्यात आलेले आहे



श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा आरंभ दि.२१ ऑगस्ट २०२६ रोजी संत महंतांच्या उपस्थितीमध्ये दीपप्रज्वलन, ग्रंथ पूजन, टाळ, मृदुंग, विना, पूजन, गुरुपूजन करून तसेच पुष्प वृष्टी करून अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा पारायण, प्रवचन, हरिपाठ, भावार्थरामायण ,हरी किर्तन, संगीत भजन व हरिजागर असे संपूर्ण सात दिवस भाविक भक्तांना हरी नामाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे



दररोज रात्री हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.यामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आपली किर्तन सेवा देणार आहेत.दि. २१ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह. भ.प. नाना महाराज कदम ◀◀ पान २ वर